विषय:- कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजनाबाबत..

जा.क्र.आस्था-२(३)/परिपत्रक/कावि- ११४/२०२०
सामान्य प्रशासन विभाग
सातारा जिल्हा परिषद सातारा
दिनांक - १७/०३/२०२०

वाचा:- मा.जिल्हाधिकारी,सातारा यांचेकडील परिपत्रक क्र. एमआयएस-०९१९/प्र.क्र.२२६/विशा-४ दि. १६/३/२०२०

## परिपत्रक

या परिपत्रकाव्दारे कळविणेत येते की , सध्या आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत कोरोना विषाणू संसर्ग बाधित रुग्ण आढळत आहेत. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत विमान प्रवासाव्दारे प्रवासी भारतात सर्वत्र प्रवास करीत आहेत. यामुळे संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणूंचे संसर्गात अधिक वाढ होवू न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपाय योजना आखणे आवश्यक आहे. सदर संशयित रुग्णामुळे आपत्तीजनक परिस्थिती सातारा जिल्हयात उदभवू नये यासाठी साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १९८७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २, ३, ४ तरतूदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे.

या पार्श्वभूमीवर कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक असून त्यानुसार खालील परिपत्रकाप्रमाणे दिनांक ३१ मार्च २०२० या कालावधीपर्यंत जिल्हयातील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालयामध्ये खालील बाबींची तात्काळ अंमलबजावणी करावी.

१) प्रतिबंधात्मक योजनेचा भाग म्हणून नागरीकांची एक ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी शासकीय/निमशासकीय कार्यालयात येणा-या अभ्यांगतांचे गर्दीचे नियंत्रण राखणे आवश्यक आहे. याकामी दिनांक ३१ मार्च २०२० पर्यंत अभ्यांगतांना शासकीय/निमशासकीय कार्यालयात आवश्यकतेप्रमाणे/अति-तातडीचे काम असेल तरच कार्यालयात प्रवेश दयावा.

२) जिल्हास्तरावर /क्षेत्रीयस्तरावर सर्व सामान्य जनतेस शासकीय माहिती अथवा इतर आवश्यक बाबींसाठी अर्जाव्दारे कार्यवाही करणेचे असल्यास गर्दी टाळण्याच्या अनुषंगाने जिल्हयातील सर्वसामान्य जनतेने शासकीय कार्यालयात न जाता मेलव्दारे अर्ज करावेत व माहिती प्राप्त करुन घ्यावी. यासाठी संबंधित विभागाने सामान्य जनतेसाठी आपले शासकीय कार्यालयातील ईमेल आयडी व फोन नंबर उपलब्ध करुन दयावेत.

३) सातारा जिल्हा परिषद कार्यालयासाठी कोरोना कालावधीसाठी पत्रव्यवहार करणेसाठीचा ईमेल आयडी ceozpstr@gmail.com /**Dyceogadstr@gmail.com** असा आहे.

४) क्षेत्रीय स्तरावर अत्यंत तातडीचे टपाल संदेश हे ईमेलव्दारे पाठविण्यात यावेत.

५) सर्वसामान्य जनतेसाठी ईमेलव्दारे प्राप्त होणा-या अर्जावर नियमानुसार विहित मुदतीत उचित कार्यवाही करुन अर्जदारांना कळविणे संबंधित शाखा विभागाची जबाबदारी राहील.

६) सर्व शासकीय कार्यालयामध्ये असणारे कर्मचारी यांनी काम करीत असताना कागदपत्र व हस्तांदोलन यामुळे संसर्ग वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी कार्यालयामध्ये वेळोवेळी सॅनिटायझरचा /हॅण्डवॉशचा वापर करावा.

७) शासकीय कार्यालयाचा परिसर स्वच्छ राहील याची दक्षता घ्यावी. तसेच कार्यालयातील कर्मचारी यांनी आपले संकलन/विभागामध्ये स्वच्छता पाळावी.

८) वैयक्तिक सुनावणीस एखादी व्यक्ती गैरहजर राहिली म्हणून प्रकरणे/केस निकाली न काढता वैयक्तिक हजेरीमध्ये सूट देवून कोरोना संक्रमण पीक कालावधीनंतर त्यास सुनावणीस पुढील तारीख देण्यात यावी.

(संजय भागवत)
मुख्य कार्यकारी अधिकारी
सातारा जिल्हा परिषद,सातारा
# ९४२२९९३३३३
ceozpstr@gmail.com

प्रत :- मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद सातारा यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रत :- मा. उपाध्यक्ष, जिल्हा परिषद सातारा यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रत:- मा. सभापती, विषय समिती (सर्व), जि.प.सातारा यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रत:- अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सातारा यांना माहितीसाठी .
प्रत:-प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा जि.प.सातारा यांना माहितीसाठी .
प्रत :- सर्व विभागप्रमुख , जिल्हा परिषद सातारा यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी.
प्रत :- गटविकास अधिकारी,पंचायत समिती (सर्व) जि. सातारा यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी.